सोनेरी क्षणांचे सोबती

बॉक्सिंगमध्ये झरीन, नीतू, अमितला सुवर्ण

वृत्तसंस्था, बर्मिंगहॅम

भारताच्या अमित पंघल (५१ किलो), निखत झरीन (५० किलो) आणि नीतू गंघास (४८ किलो) यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक मिळवले.

५१ किलो गटाच्या अंतिम फेरीत अमितने ब्रिटनच्या किअरन मॅकडोनाल्डला ५-०ने पराभूत करून सुवर्णपदक मिळवले. गेल्या गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल स्पर्धेत २६ वर्षीय अमितला मॅकडोनाल्डकडून अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागल्याने रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. त्या पराभवाची परतफेड करण्यासाठी अमित आतूर दिसला. त्याने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. त्याचा एक ठोसा इतका जबरदस्त होता, की मॅकडोनाल्डच्या उजव्या डोळ्याला दुखापत झाली. त्याला टाके घालावे लागले. पहिल्या दोन फेरीत अमितने वर्चस्व राखल्यानंतर तिसऱ्या फेरीत मॅकडोनाल्डने उंचीचा फायदा घेऊन पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, २०१८च्या जकार्ता एशियाडमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या अमितने मॅकडोनाल्डला संधी दिली नाही. विजयानंतर अमित म्हणाला, 'मॅकडोनाल्ड माझ्यापेक्षा उंच आहे. त्यामुळे मला आक्रमक खेळ करावा लागणार होता. त्याच्याविरुद्ध कसा खेळ करावा, यासाठी प्रशिक्षकांनी चांगली योजना आखली होती. ही योजना रिंगमध्ये यशस्वी ठरली, तेव्हा विजयाचे श्रेय त्यांना जाते. मागील पराभवाचा मी बदला घेऊ शकलो.'

यानंतर पदार्पणाची राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा खेळत असलेल्या नीतूने महिलांच्या ४८ किलो गटाच्या अंतिम फेरीत २०१९च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील ब्राँझपदक विजेत्या इंग्लंडच्या डॅमी-जॅड रेसइस्तानवर ५-०ने मात केली. नीतूने नऊ मिनिटांच्या खेळात संपूर्ण नियंत्रण राखले. तिने घरच्या मैदानावर खेळत असलेल्या डॅमीला संधीच दिली नाही. २१ वर्षीय हरियाणाच्या नीतूने आपल्या उंचीचा चांगला उपयोग केला. तिचे ठोसे बरोबर डॅमीच्या चेहऱ्यावर बसत होते. तिने हे पदक आपल्या कुटुंबीयांना अर्पण केले.

५० किलो गटाच्या अंतिम फेरीत निखतने नॉर्दर्न आयर्लंडच्या कॅरली मॅक नॉलवर ५-०ने मात करून सुवर्णयश मिळवले. पदार्पणाच्याच राष्ट्रकुल स्पर्धेत २६ वर्षीय आंध्र प्रदेशच्या निखतने चमक दाखवली. राष्ट्रकुल स्पर्धेत निखतने ५२ किलोवरून ५० किलो गटात खेळण्याचा निर्णय घेतला. आक्रमक ठोशांसोबतच निखतचा बचाव भक्कम होता. निखतने याच वर्षी । जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे.

निखत झरीन
नितू घंघास
अमित पंघल

भविनाला सुवर्णपदक

बर्मिंगहॅम : भारताच्या भविना पटेलने पॅराराष्ट्रकुल स्पर्धेतील पॅराटेबल टेनिसमध्ये महिला एकेरीच्या क्लास ३-५मध्ये सुवर्णपदकाची कमाई केली. भारताची दुसरी खेळाडू सोनलबेन पटेलने ब्राँझपदक मिळवले. ३५ वर्षीय गुजरातच्या भविनाने अंतिम फेरीत नायजेरियाच्या इफेचुक्वूजे ख्रिस्टिना इकपेओकीवर १२-१०, ११-२, ११-९ असा विजय मिळवला. भविनाने टोकियो पॅरालिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकले आहे. त्याचबरोबर २०१३च्या बीजिंगमधील एशियाड पॅराटेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक मिळवले आहे. याच स्पर्धेत २०१७मध्ये तिने ब्राँझपदकाची कमाई केली होती. याच गटात ३४ वर्षीय सोनलबेन पटेलने इंग्लंडच्या सुए बेलीवर ११-५, ११-२, ११-३ अशी मात करून ब्राँझपदकाची कमाई केली. क्लास ३-५मध्ये राजव अरविंदन अल्गारला ब्राँझपदकाच्या लढतीत पत्करावा लागला आहे.

यशाची सुवर्ण उडी

वृत्तसंस्था, बर्मिंगहॅम

भारताच्या एल्डोस पॉल आणि अब्दुल्ला अबूबाकेर यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या तिहेरी उडीत अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्यपदक मिळवले. भारताचा तिसरा खेळाडू प्रवीण चित्रावेलला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. अन्यथा या प्रकारातील तिन्ही पदके भारताच्या खात्यात जमा झाली असती.

पॉलने अंतिम फेरीत १७.०३ मीटर कामगिरी नोंदवून सुवर्णपदक मिळवले. त्याची तिसऱ्या प्रयत्नातील कामगिरी सर्वोत्तम ठरली. यानंतर अबूबाकेरने १७.०२ मीटर कामगिरी नोंदवून रौप्यपदक जिंकले. त्याची पाचव्या प्रयत्नातील कामगिरी सर्वोत्तम ठरली. बर्मुडाचा जाह-न्हाल पेरिंचिफने १६.९२ मीटर कामगिरी नोंदवून ब्राँझपदकाची कमाई केली. प्रवीणला १६.८९ मीटर कामगिरी नोंदविता आली. सुरुवाती २५ वर्षीय केरळचा पॉल पदकाच्या शर्यतीतही नव्हता. पहिल्या प्रयत्नात त्याला १४.६२ मीटर अशीच कामगिरी नोंदविता आली होती. मात्र, यानंतर पॉल आणि अबूबाकेर यांच्यातच स्पर्धा बघायला मिळाली. या दोघांचेही प्रशिक्षक एम. हरिकृष्णन आहेत. कॉलेजच्या दिवसांत पॉल हा पोल व्हॉल्ट आणि क्रॉस कंट्रीमध्ये सहभागी होत होता. यानंतर त्याने आपला मोर्चा तिहेरी उडीकडे वळविला.

तिहेरी उडीत पहिली दोन पदके भारतालाच

अनूला ब्राँझ

भारताच्या अनू राणीने महिलांच्या भालाफेकीत ब्राँझपदक जिंकूनही इतिहास रचला. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भालाफेकीत पदक जिंकणारी ती पहिलीच महिला खेळाडू ठरली. राणीने चौथ्या प्रयत्नात ६० मीटर कामगिरी नोंदवून तिसरा क्रमांक पटकावला. २९ वर्षीय मेरठच्या राणीने २०१४च्या एशियाडमध्ये ब्राँझपदक मिळवले आहे. राणीच्या आधी काशिनाथ नाईक (२०१०) आणि ऑलिम्पिक चॅम्पियन नीरज चोप्रा (२०१८) यांनी राष्ट्रकुलमध्ये पुरुषांच्या भालाफेकीत अनुक्रमे ब्राँझ आणि सुवर्णपदक मिळवले आहे.

संदीपला ब्राँझपदक

भारताच्या संदीपकुमारने पुरुषांच्या दहा हजार मीटर चालण्याच्या शर्यतीत ब्राँझपदकाची कमाई केली. त्याने ३८ मिनिटे ४९.२१ सेकंद वेळ नोंदवली. ही त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ठरली.

रागवा, संताप व्यक्त करा; पण मार्ग काढा

हॉकी संघाच्या ब्राँझचे गमक

वृत्तसंस्था, बर्मिंगहॅम

'रागवा... तुम्हाला पूर्ण अधिकार आहे! हा राग आपल्या खेळातून व्यक्त करा, पण मार्ग काढा. ब्राँझ पदक जिंकायचेच आहे', असा कानमंत्र भारतीय महिला हॉकी संघाला मुख्य प्रशिक्षक यानेके शॉपमॅन यांनी दिला होता. यातून प्रेरणा घेत भारतीय महिला हॉकी संघाने रविवारी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ब्राँझ पदक पटकावले. सविता पुनियाच्या नेतृत्वाखाली भारताने ब्राँझ पदकाच्या लढतीत शूटआऊटमध्ये न्यूझीलंडवर २-१ अशी केली.

भारतीय महिला हॉकी संघाने १६ वर्षांनंतर राष्ट्रकुल हॉकीत पदकाची कमाई केली आहे. 'आम्ही ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या लढतीतही झोकून देत कामगिरी केली, पण तांत्रिक चुकीमुळे शूटआऊटची सुरुवातच वाईट झाली. जे अगदीच अयोग्य होते. आम्ही ती बाबही स्वीकारली असून पुढे जायचे ठरविले आहे', असे प्रशिक्षक शॉपमन यांनी ऑनलाइन पत्रकार परिषदेत सांगितले.

अशी झाली लढत

- निर्धारित वेळे १-१ बरोबरी
- शूटआऊटमध्ये भारत २-न्यूझीलंड १
- कर्णधार सविता पुनियाची पुन्हा दमदार कामगिरी
- सोळा वर्षांनी भारतीय महिला संघाने राष्ट्रकुल पदक पटकावले
- निर्धारित वेळेत भारताकडून सलिमा टेटे हिचा गोल
- शूटआऊटमध्ये कर्णधार सविताने न्यूझीलंडचे गोलचे तीन प्रयत्न उधळले
- शूटआऊटमध्ये भारताकडून सोनिका, नवनीत यांचे गोल

तांत्रिक चुकीचा काढला राग

आम्ही तांत्रिक चुकीमुळे ऑस्ट्रेलियाविरुद्धचा उपांत्य सामना गमावला, असे भारताचे प्रशिक्षक शॉपमन सांगतात. त्यामुळे त्यांनी संघातील खेळाडूंनाही त्याच लढतीचा दाखला देत ब्राँझ पदकाच्या लढतीत इर्ष्येने खेळण्याचा सल्ला दिला. 'त्या पराभवानंतर मी मुलींची बैठक घेतली. या पराभवाचा सगळा राग तुम्ही ब्राँझ पदकाच्या लढतीत काढा. असे मी मुलींना सांगितले. उपांत्य लढतीत पंचांची चूक नव्हती. त्यांनी आमची मागितली. मी फक्त आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनला विनंती करेन की, फक्त नियमांच्या आधारे निकाल देऊ नका, कारण नियमांपेक्षा खेळात एकरूप होणारे खेळाडू महत्त्वाचे असतात', असे शॉपमन म्हणाले.

सुवर्ण एका पावलावर

बर्मिंगहॅम : भारताच्या बॅडमिंटनपटूंसाठी बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे सुवर्ण पदक एका पावलावर आले आहे. सलग दोन ऑलिम्पिकमध्ये पदकांची कमाई करणारी पी. व्ही. सिंधू, जागतिक स्पर्धेतील ब्राँझ पदकविजेता लक्ष्य सेन, पुरुष दुहेरीतील आघाडीची जोडी सात्विक-चिराग या भारताच्या बॅडमिंटन शिलेदारांनी अंतिम फेरीत धडक मारली आहे.

महिला दुहेरीतील त्रिसा जॉली, गायत्री गोपीचंद यांचा उपांत्य फेरीत पराभव झाल्याने त्यांना ब्राँझ पदकाची संधी आहे. जागतिक स्पर्धेतील उपविजेता किदाम्बी श्रीकांतलाही उपांत्य फेरीत पराभवाचा सामना करावा लागल्याने त्यालाही ब्राँझ पदकाची संधी असेल.

रविवारी पार पडलेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत सिंधूने आपल्या खेळातील तांत्रिक बाबी चोख ठेवण्यावर लक्ष केंद्रित केले होते. ज्यामुळे तिने सिंगापूरच्या येओ जिया मिन हिचे आव्हान २१-१९, २१-१७ असे ४९ मिनिटांत परतवून लावले. लक्ष्य सेनने जागतिक रँकिंगमध्ये ८७व्या क्रमांकावरील जिया हेंग तेहची कडवी झुंज २१-१०, १८-२१, २१-१६ अशी मोडून काढली.

दुहेरीत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पुरुष दुहेरीत मलेशियाच्या चेन पेंग सून-तियान कियान मेन यांना २१-६, २१-१५ असे सहज हरवत सुवर्ण पदकाच्या लढतीत प्रवेश मिळवला.

राष्ट्रकुलच्या पुरुष एकेरीत अखिल भारतीय अंतिम लढत होताहोता राहिली. श्रीकांतला उपांत्य फेरीत मलेशियाच्या झी यॉंग एनजीकडून १३-२१, २१-१९, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला.

हिन्दुस्थान पेट्रोलियम

हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : पेट्रोलियम हाऊस, १७, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०
दूरध्वनी : +९१-२२-२२८६३९०० **फॅक्स :** +९१-२२-२२८७२९९२
ई-मेल : corphqo@hpcl.in **संकेतस्थळ :** www.hindustanpetroleum.com
सीआयएन : L23201MH1952GOI008858

आज़ादी का अमृत महोत्सव

७०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

वार्षिक सर्वसाधारण सभा

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीची ७०वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार, ३० ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता (भाप्रवे) एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसाय व्यवहार करण्यासाठी लागू असलेली एमसीए परिपत्रके/कंपनी कायदा/सेबी नियमच्या (एकत्रितपणे वैधानिक तरतुदी म्हणून संदर्भित) तरतुदींची पूर्तता करत असताना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हिसी)/इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) द्वारे आयोजित केली जाईल. एजीएमची कार्यवाही कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात आयोजित केली जाते असे मानले जाईल.

एजीएम आणि वार्षिक अहवालाची सूचना

वार्षिक २०२१-२२ चा वार्षिक अहवाल आणि आर्थिक विवरणे, लेखा परीक्षकांचा अहवाल इत्यादींचा समावेश असलेली एजीएम आयोजित करणारी सूचना ज्या सदस्यांचे नोंदणीकृत ईमेल आयडी डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी)/निबंधक आणि हस्तांतरण एजंट (डीपी) यांच्याकडे उपलब्ध आहेत त्यांना ई-मेल करण्यात आले आहेत (आरटीए). उपरोक्त दस्तऐवज कंपनीच्या **www.hindustanpetroleum.com** स्टॉक एक्सचेंजच्या **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** या संकेतस्थळावर आणि ई-मतदान एजन्सी मेसर्स नॅशनल सिक्युरिटीज डिपॉजिटरी लिमिटेड (एनएलडीएल) **www.evoting.nsdl.com**

इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ई-मतदान:

लागू वैधानिक तरतुदींच्या अनुषंगाने, कंपनीने आपल्या सदस्यांना एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान सुविधेची तरतूद खालीलप्रमाणे केली आहे :

दूरस्थ ई-मतदान	एजीएमच्या पूर्वी	एजीएम दरम्यान
प्रारंभ	गुरुवार, २५ ऑगस्ट, २०२२ [सकाळी ९.०० वाजल्यापासून (भाप्रवे)]	मंगळवार, ३० ऑगस्ट, २०२२
शेवट	सोमवार, २९ ऑगस्ट, २०२२ [संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत (भाप्रवे)]	मंगळवार, ३० ऑगस्ट, २०२२ (एजीएम संपल्यानंतर १५ मिनिटे)
कट-ऑफ तारीख (मतदान करण्याच्या पात्रतेसाठी)	मंगळवार, २३ ऑगस्ट, २०२२	
प्रवेश करण्यासाठी वेब लिंक	https://www.evoting.nsdl.com	
ई-मतदान कार्यक्रम क्रमांक	ईव्हीईएन – १२०७०९	

सदस्यांनी कृपया एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे ई-मतदान प्रक्रियेचा संदर्भ घ्यावा अशी विनंती आहे.

सूचना :

१. ज्या व्यक्तीचे नाव नोंदणीकृत सदस्य/लाभधारक मालकांमध्ये कट-ऑफ तारखेला म्हणजेच २३ ऑगस्ट, २०२२ रोजी दिसून येते त्यांनाच दूरस्थ ई-मतदान तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करण्याची सुविधा मिळण्याचा हक्क असेल.
२. सदस्यांचे मतदान हक्क २३ ऑगस्ट २०२२ रोजी कंपनीच्या प्रदान केले समभाग भांडवलाच्या स्वरुपात धारण केलेल्या समभागाच्या प्रमाणात असतील.
३. ज्या सदस्यांनी आपले ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत अशा कोणत्याही व्यक्ती ज्या एजीएमच्या सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे सदस्य बनलेली कोणतीही व्यक्ती परंतु ई-मतदानाच्या कट-ऑफ तारखेपूर्वी म्हणजेच २३ ऑगस्ट २०२२ पूर्वी कंपनीला विनंती ईमेल करू शकतात. cosecy@mail.hpcl.co.in येथे सूचना आणि वार्षिक अहवालाची प्रत मिळविण्यासाठी फोलिओ क्रमांक/डीपी-आयडी क्लायंट आयडी उद्धृत करून. अशा सदस्यांना विनंती आहे की त्यांनी दूरस्थ ई-मतदानासाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी एजीएमच्या नोटिसमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करावे.
४. एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले सदस्य देखील व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात/सहभागी होऊ शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.
५. जे सदस्य व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहतील आणि दूरस्थ ई-मतदानाद्वारे त्यांचे मत यापूर्वी दिलेले नाही आणि अन्यथा त्यांना असे करण्यापासून प्रतिबंधित केले नाही, ते एजीएम दरम्यान मतदान करण्यास पात्र असतील.
६. दूरस्थ ई-मतदानाला, कोणत्याही परिस्थितीत, नियोजित तारीख आणि वेळेच्या पुढे परवानगी दिली जाणार नाही.
७. वार्षिक अहवालाचा भाग असलेल्या वैधानिक नोंदणी/कागदपत्रांची तपासणी करु इच्छिणारे सदस्य एजीएमच्या तारखेपर्यंत कंपनीला cosecy@mail.hpcl.co.in या ईमेल आयडीवर लिहू शकतात.
८. एजीएम दरम्यान प्रश्न विचारू इच्छिणाऱ्या सदस्यांनी त्यांचे नाव, फोलिओ क्रमांक/डीपी-आयडी क्लायंट आयडी, ईमेल आयडी, मोबाइल नंबर cosecy@mail.hpcl.co.in वर विनंत्या पाठवून वक्ता म्हणून स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे. २३ ऑगस्ट २०२२ (सकाळी ९.०० भाप्रवे) ते २६ ऑगस्ट २०२२ (संध्याकाळी ५.०० भाप्रवे). ज्या सदस्यांनी स्वतःची वक्ता म्हणून नोंदणी केली आहे त्यांनाच एजीएम दरम्यान त्यांचे मत मांडण्याची/प्रश्न विचारण्याची परवानगी असेल.
९. कोणत्याही शंका असल्यास, सदस्य भागधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि एनएसडीएल **www.evoting.nsdl.com** च्या येथे डाउनलोड विभागात उपलब्ध भागधारकांसाठी ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका पाहू शकतात किंवा टोल फ्री वर कॉल करू शकतात. १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० किंवा श्री. अमित विशाल/श्रीमती पल्लवी म्हात्रे, एनएसडीएल यांच्याशी evoting@nsdl.co.in या नियुक्त ईमेल आयडीवर संपर्क साधा.

रेकॉर्ड तारीख, अंतिम लाभांश भरणे आणि स्त्रोतावरील कर वजावट (टीडीएस)

२०२१-२२ च्या आर्थिक वर्षासाठी प्रत्येकी रु. १० च्या दर्शनी मूल्याच्या प्रति समभाग रु. १४ दराने अंतिम लाभांशाचे प्रदान २०२१-२२ च्या एजीएममध्ये घोषित केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत स्त्रोतावर कर वजा केल्यावर दिले जाईल. ज्या सदस्यांची नावे मंगळवार, २३ ऑगस्ट, २०२२ (रेकॉर्ड तारीख) रोजी सदस्य नोंदणी/बेन्पोस मध्ये असतील त्यांनाच हा अंतिम लाभांश प्रदान केला जाईल. लाभांश, टीडीएस लागूता आणि कर सवलतीची कागदपत्रे सादर करण्याबाबत ईमेलद्वारे पाठवलेला तपशीलवार संवाद **https://www.hindustanpetroleum.com/dividend-information** वर प्रवेश करता येईल.

ठिकाण : मुंबई
तारीख : ऑगस्ट ६, २०२२

मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
वी. मुरली
कंपनी सचिव

/hpcl | /hpcl | /hpcl
www.hindustanpetroleum.com
Wear reusable face cover or mask
Wash hands frequently and thoroughly
Maintain Physical Distance

विश्वनाथन आनंद फिडेच्या उपाध्यक्षपदी

चेन्नई : भारताचा माजी जगज्जेता बुद्धिबळपटू विश्वानाथन आनंदची फिडेच्या (जागतिक बुद्धिबळ) उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच अरकॅडी व्होरकोविच यांची बहुमतामुळे पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे. कारकिर्दीत पाचवेळा जगज्जेतेपद पटकावणारा आनंद हा आधीपासूनच व्होरकोविच यांच्या गटात होता. व्होरकोविच यांना १५७ मते लाभली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी अंद्री बारीशपॉलेट्स यांना अवघी १६ मते लाभली.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ईमेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

कंपनीच्या भागधारकांसाठी सूचना

पंचेचाळिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (आयपीओ-पश्चात) आणि ई-मतदानासंबंधी माहिती

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या परिपत्रकांची पूर्तता करत असताना, **सोमवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी भाप्रवेळ दुपारी २:०० वाजता** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**''व्हीसी''**)/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (**''ओएव्हीएम''**) होणाऱ्या कंपनीच्या पंचेचाळिसाव्या (आयपीओ-पश्चात) वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (**''एजीएम''**), आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ चे स्वतंत्र व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय विवरण, त्याचप्रमाणे संचालक मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल व त्यासोबत जोडण्याची आवश्यकता असलेले इतर दस्तऐवज, कंपनीच्या सदस्यांना ७ ऑगस्ट, २०२२ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत. एजीएमची सूचना आणि वर नमूद करण्यात आलेले दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या म्हणजे बीएसई लिमिटेड (**''बीएसई''**) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (**''एनएसई''**) यांच्या वेबसाईटसवर अनुक्रमे **www.bseindia.com** येथे आणि **www.nseindia.com** येथे व कंपनीचे रजिस्ट्रार व हस्तांतरण एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (**''केफिनटेक''**) यांच्या वेबसाईटवर **https://evoting.kfintech.com** येथे उपलब्ध आहेत.

एजीएमची सूचना प्रसारित करण्याच्या तारखेपासून एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आलेले दस्तऐवज सदस्यांसाठी तपासणीसाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध आहेत. सदर दस्तऐवज तपासण्याची इच्छा असलेल्या सदस्यांनी **rilagm@ril.com** येथे ई-मेल पाठवावे.

दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या दरम्यान ई-मतदान:

कंपनी आपल्या सदस्यांना एजीएममध्ये मंजूर करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (**''ई-मतदान''**) मतदान करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देत आहे. सदस्य येथे खाली नमूद करण्यात आलेल्या तारखांना दूरस्थ पद्धतीने मतदान करू शकतील (**''दूरस्थ ई-मतदान''**). कंपनीने ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केफिनटेक यांच्या सेवा घेतल्या आहेत.

डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात, छापील स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या आणि ज्यांनी त्यांचे ई-मेलचे पत्ते नोंदविले नाहीत अशा सदस्यांसाठी दूरस्थ मतदान पद्धतीने मतदान करण्यासह, मतदानाशी संबंधित माहिती आणि सूचना एजीएमच्या सूचनेत देण्यात आल्या आहेत. (अ) एजीएमची सूचना पाठविण्यात आल्यानंतर कंपनीची सदस्य बनलेल्या आणि अंतिम मुदतीच्या तारखेला (येथे नमूद करण्यात आली आहे) समभाग धारण करणाऱ्या व्यक्ती; (ब) युजर आयडी आणि पासवर्ड विसरलेले सदस्य, यांनी कोणत्या पद्धतीने युजर आयडी आणि पासवर्ड मिळवावे/तयार करावे हे एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आले आहे.

दूरस्थ ई-मतदान सुविधा खालील मतदान कालावधीत उपलब्ध असेल:

दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची वेळ : **बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी भाप्रवेळ दुपारी ०१:०० वाजता**
दूरस्थ ई-मतदान संपण्याची वेळ : **रविवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२२ रोजी भाप्रवेळ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत**

वरील तारीख व वेळेनंतर दूरस्थ ई-मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि केफिनटेक द्वारा वरील कालावधी संपल्यानंतर दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल बंद करण्यात येईल.

ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही असे एजीएमला उपस्थित असलेले सदस्य एजीएममध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान (**''इन्स्टा पोल''**) करू शकतील.

अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी ज्याचे नाव सदस्यांच्या रजिस्टरमध्ये नोंदविण्यात आले आहे अशी व्यक्तीच फक्त दूरस्थ ई-मतदान सुविधेचा लाभ घेण्यास किंवा इन्स्टा पोल द्वारा मतदान करण्यास पात्र असेल.

ई-मेलचा पत्ता नोंदवण्याची/सुधारणा करण्याची पद्धती:

अ) ज्यांनी कंपनीपाशी त्यांच्या ई-मेलच्या पत्याची नोंदणी/सुधारणा केली नाही अशा छापील स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना, आवश्यक पूरक दस्तऐवजांसह योग्य प्रकारे भरलेले आणि स्वाक्षरी केलेले प्रपत्र आयएसआर-१ (कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे उपलब्ध) केफिनटेक यांना सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबॉवली, फायनान्शियल जिल्हा, नानक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२, येथे सादर करून त्यांच्या ई-मेल पत्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ब) ज्यांनी त्यांच्या ई-मेलच्या पत्याची नोंदणी/सुधारणा केली नाही अशा डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना, त्यांचे डिमॅट खाते जेथे आहे अशा डिपॉझिटरी सहभागीकडे त्यांच्या ई-मेलच्या पत्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ई-मतदानासंबंधी काही शंका असल्यास, सदस्यांनी केफिनटेकची वेबसाईट: **https://evoting.kfintech.com** येथे ई-मतदानासाठी उपलब्ध असलेल्या ''डाऊनलोडस'' भागात ड्रॉपडाऊन द्वारा उपलब्ध असलेला ''हेल्प'' आणि ''एफएक्यू'' भाग/ई-मतदान वापरण्याविषयी माहिती पुस्तक पहावे.

ई-मतदानासंबंधी काही चौकशी/तक्रार असल्यास, सदस्यांना खालील संपर्काच्या तपशीलाची नोंद घेण्याची विनंती करण्यात येत आहे:
श्री. एस्. पी. वेणुगोपाल, उपाध्यक्ष,
केफिन टेक्नॉलॉजीज् लिमिटेड
सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबॉवली, फायनान्शियल जिल्हा,
नानाक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२
ई-मेल: **evoting.ril@kfintech.com**
टोल फ्री क्रमांक: १८०० ३०९ ४००१ (सर्व कामकाजाचे दिवशी सकाळी ९:०० ते सायंकाळी ६:०० पर्यंत)

व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएममध्ये सहभागी होणे:

सदस्य जिओमिट द्वारा https://jiomeet.jio.com/rilagm येथे व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएमला उपस्थित राहू शकतील. येथे वापरण्याची लॉगइनची माहिती आणि एजीएमला उपस्थित राहण्याचे टप्पे यासंबंधी माहिती एजीएमच्या सूचनेत टिप क्र.९ मध्ये देण्यात आली आहे. ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केले आहे असे सदस्य एजीएमला उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा एजीएममध्ये त्यांचे मतदान करण्यास पात्र नसतील.

संचालक मंडळाच्या आदेशाने
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि
कम्प्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ८ ऑगस्ट, २०२२

www.ril.com

VINATI ORGANICS LIMITED

Regd. Office : B-12 & B-13/1, MIDC Indl. Area, Mahad - 402 309, Dist. Raigad, Maharashtra.
Phone - +91-22-61240444/28, Fax - +91-22-61240438

CIN - L24116MH1989PLC052224, Email - vinati@vinatiorganics.com, Website - www.vinatiorganics.com

31% Net Revenue YOY
26% EBITDA YOY
25% Net Profit YOY

EXTRACT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2022

(₹ in Crore, Except EPS)

	Particulars	Quarter Ended			Year Ended
		30/06/2022	30/06/2021	31/03/2022	31/03/2022
		(Unaudited)	(Unaudited)	(Audited)	(Audited)
1.	Total income from operations	506.32	386.37	486.09	1,615.51
2.	Net profit / (loss) for the period before tax	136.28	108.08	141.99	449.25
3.	Net profit / (loss) for the period after tax	101.19	80.92	101.10	346.62
4.	Total Comprehensive Income for the period (Comprising Profit for the period after tax and other comprehensive income after tax)	101.12	80.87	100.96	346.34
5.	Paid up Equity share capital	10.28	10.28	10.28	10.28
6.	Earnings per share (before extraordinary items) (of ₹ 1/- each)				
	Basic	9.85	7.87	9.84	33.72
	Diluted	9.85	7.87	9.84	33.72
7.	Earnings per share (after extraordinary items) (of ₹ 1/- each)				
	Basic	9.85	7.87	9.84	33.72
	Diluted	9.85	7.87	9.84	33.72

Reserves (excluding Revaluation Reserve) as on 31st March, 2022 is ₹1817.74 Crore.

Notes:

1. The above is an extract of the detailed format of Financial Results for the quarter ended 30.06.2022 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the financial results are available on the websites of BSE and NSE at www.bseindia.com and www.nseindia.com respectively and on Company's website at www.vinatiorganics.com.

2. Additional Information on standalone financial results is as follows: (₹ in Crore)

	Particulars	Quarter Ended			Year Ended
		30/06/2022	30/06/2021	31/03/2022	31/03/2022
		(Unaudited)	(Unaudited)	(Audited)	(Audited)
1.	Revenue from operations	506.32	386.37	486.09	1,615.51
2.	Profit before tax	136.28	108.10	141.99	449.31
3.	Net Profit after tax	101.19	80.95	101.10	346.68

3. The above results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their respective meeting held on 06.08.2022.

For Vinati Organics Limited
Sd/-
Vinati Saraf Mutreja
Managing Director & CEO
DIN : 00079184

Place : Mumbai
Date : 06/08/2022